# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत,पुणे ४११ ००१.

web: www.dirhe.org E-mail: dirhe@pn2.vsnl.net.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३


क्र.उशिसं/खुगुशि/नमं/२०१०-११/१४अई /६९८ दि.

**परिपत्रक :-**

**अत्यंत तात्काळ.**


कुलसचिव कार्यालय
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ
नांदेड–४३१६०६
आ. क्र.........विभाग......
S340 17.8.10

10 AUG 2010


प्रति,

१. कुलसचिव,
राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

**विषय : शासकीस/अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान व विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.**
**नविन मंजूरी सन २०१०-२०११**

**संदर्भ** : १.शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग,मुंबई क्र.एससीएस १०६२, दि. २४/१२/१९५२.
२.शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग,मुंबई क्र.एसीएच १०६३,यु, दि. ४ जून,१९६४ व दि.१६/११/१९६४.
३.शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग,मुंबई क्र.एसएओएच/१०८२/५०६३२००/(२६५१)/सासी-५, दि. २१/१०/१९८५
४.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मुंबई क्र.एससीएच २००३/(४०५/०३)/ मशि-१, दि. ५/२/२००४.

शासकीय/अशासकीय कला,वाणिज्य,विज्ञान व विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती सन २०१०-२०११ या वर्षी मंजूरी करण्यासाठी विहित नमुन्यात दि.३०.९.२०१० पर्यंत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

खुली गुणवत्ता शिष्यवृत्तीचे प्रस्ताव खालील बाबीची पडताळणी करुनच संचालनालयास पाठवावी

१. **आपले महाविद्यालय कोणत्या शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण यांच्या अधिपत्याखाली येते त्याचा स्पष्ट उल्लेख करावा.**

२. **खुल्या गुणवत्ता शिष्यवृत्तीचे प्रस्ताव कला शाखा,वाणिज्य शाखा,विज्ञान शाखा व विधी शाखा असे स्वतंत्रपणे शाखानिहाय तसेच गुणवत्तानिहाय (टक्केवारीनुसार) पाठविण्यात यावेत.**

३. **विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत मार्च २०१० या वर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका स्वाक्षरी करुनच जोडण्यात यावी. प्रस्ताव हे फक्त सन २०१०-११ या वर्षीचे पाठवावे. यापूर्वीचे प्रस्ताव पाठवू नये.**

४. **पाठविलेल्या आवेदन पत्रावर प्राचार्यांची अथवा संस्था प्रमुखांची सही व शिक्का आवश्यक आहे.त्याशिवाय आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.**

आपल्या विद्यापीठातील व विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील संलग्नित शासकीय/अशासकीय महाविद्यालय मार्च,२०१० मध्ये उच्च माध्यमिक १२ वीची परीक्षा ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या कला,वाणिज्य,विज्ञान व विधी महाविद्यालयात प्रथम वर्षाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरुन **दि. ३० सप्टेंबर,२०१०** पर्यंत या संचालनालयास पाठविण्यात यावी. **तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही** याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यावर राहील.कालमर्यादेची मर्यादा कटाक्षाने पाळावी. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना लवकरांत लवकर देता यावा म्हणून महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून अर्ज त्वरित भरुन घेऊन प्रस्ताव विहित कालमर्यादेत पाठविण्यात यावेत अशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात याव्यात.

राज्य शासनाची खुली गुंणवत्ता शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,शिष्यवृत्ती शाखा,महाराष्ट्र राज्य,पुणे-१ या पत्त्यावर पाठवावेत. अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

आपणांस कळविण्यात येते की,मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांनी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून सर्व शिष्यवृत्या व रक्कम ईसीएस (ECS) द्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यांत जमा करण्याचे आदेश दिलेले आहेत.त्यानुसार **विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या बँक ऑफ महाराष्ट्र किंवा इतर अन्य राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडणे बंधनकारक असून, विद्यार्थ्यांनी त्याचा खाते क्रमांक,बँकेचा संपूर्ण पत्ता,बँक शाखा,शाखा कोड नंबर तसेच बँकेचा एमआय सीआर कोड इत्यादी माहिती बिनचूकपूणे अर्जात नमूद करावी.( सोबत पास बुकची झेरॉक्स प्रत जोडावी.)**

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**
**यांचेकरिता.**

**प्रत :** सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२/- त्यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील कार्यक्षेत्रात येणा-या महाविद्यालयांना देखील आपल्या स्तरावरुन परिपत्रक काढून कळविण्यात यावे.

# राज्य सरकारच्या गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी अर्ज

(१२ वी नंतर करावयाचा अर्ज)

(महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात शिकत असणा-या विद्यार्थ्यांकरिता ही माहिती ३१ ऑगस्ट पूर्वी शिक्षण संचालक,पुणे यांना मिळाली पाहिजे.तद्नंतर आल्यास विचार केला जाणार नाही.)

इतर कुठलीही शिष्यवृत्ती पूर्वी मंजूर झालेली असल्यास या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु नये.

| परीक्षेचे नाव | परीक्षा घेणारे विद्यापीठ/शालांत परीक्षा मंडळ. | परीक्षेत मिळालेले एकूण गुण किती/कितीपैकी (Aggregate) | एकूण प्रतिशत (शेकडा) गुण |
|---|---|---|---|
| मार्च २०० मध्ये दिलेली परीक्षा एस.वाय.जे.सी. (उच्च माध्यमिक बारावी) | | | |

वरील माहिती संपूर्ण बरोबर आहे. मी उत्तीर्ण केलेल्या परीक्षेचे प्रमाणित गुणपत्रक सोबत जोडले आहे.

* दिनांक :

(*दिनांकविरहित अर्ज आल्यास विचारात घेतला जाणार नाही.) विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

(१) विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव व पत्ता (आडनाव प्रथम लिहिणे) :

(२) विद्यार्थी अनुसूचित जाती/जमाती,विमुक्त जाती किंवा इतर मागासवर्गातील आहे काय ?असल्यास कोणत्या ? :

(३) प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे नांव :

(४) प्रवेश घेतल्याची तारीख :

(५) प्रवेश कोणत्या वर्गात व कोणत्या शिक्षणक्रमासाठी घेतला ?. :

(६) इतर शिष्यवृत्तीसाठी अर्ज केला आहे काय? असल्यास त्या शिष्यवृत्तीचे नांव. :

(७) इतर कुठली शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे काय? असल्यास कोणती?. :

वरील माहिती पडताळून पाहिली व ती बरोबर आहे.विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर करण्यात शिफारस आहे.

स्थळ : संस्था प्रमुखांची सही व हुद्दा.

दिनांक :

टिप: या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट नाही.वरील १ ते ७ अनुक्रमांकासमोरील माहिती भरणे गरजेचे आहे

१. बँक ऑफ महाराष्ट्र/राष्ट्रीयकृत बँकेचे खाते क्रमांक.
२. बँकेचा संपूर्ण पत्ता.
३. बँक शाखा कोड नंबर.
४. बँक एमआय सीआर कोड क्रमांक